**ठळक बातम्या**

- भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात मुक्त व्यापार करार वर्ष अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांचे निर्देश

- चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी दर वाढून ६ पूर्णांक २ दशांश टक्क्यावर

- सातत्यानं सुरू असलेल्या घसरणीमुळे देशातले शेअर बाजार ९ महिन्यातल्या नीचांकी पातळीवर

**आणि**

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अफगाणिस्तानचं ऑस्ट्रेलियापुढं विजयासाठी २७४ धावांचं आव्हान, ऑस्ट्रेलियाच्या डावात पावसाचा व्यत्यय

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात वर्ष अखेरपर्यंत मुक्त व्यापार करार पूर्ण करण्याचे निर्देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी आज दिले. सचिव तन्मय लाल यांनी आज दुपारी नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी चर्चा केली. या कराराबाबत वाटाघाटी सुरू असल्याचं तन्मय लाल यांनी सांगितलं. पुरवठा साखळी आणि कौशल्य वाढवणं,

सेमीकंडक्टरच्या सामंजस्य कराराबाबत चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. भारताचं एआय मिशन आणि युरोपियन एआय ऑफिसमध्येही सहकार्य वाढत असल्याचं ते म्हणाले. हरित ऊर्जेवर संशोधन प्रकल्पांसाठी ६ कोटी युरोचा निधी जाहीर करण्यात आला असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशाचा जीडीपी अर्थात स्थूल राष्ट्रीय उत्पादन ६ पूर्णांक २ दशांश टक्के इतका वाढला आहे. दुसऱ्या तिमाहीत हा दर ५ पूर्णांक ६ दशांश टक्के इतका होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज सुधारित आकडेवारी जारी केली आहे. यामुळे जगातली सर्वात वेगानं वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारतानं आपलं स्थान कायम ठेवलं आहे. चालू आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी साडे ६ टक्क्यांनी वाढण्याची आशा या आकडेवारीत  व्यक्त केली आहे.

२०२३-२४ या आर्थिक वर्षात हा दर ९ पूर्णांक २ दशांश टक्के इतका होता. कोरोनानंतरच्या आर्थिक वर्षाचा अपवाद वगळता हा गेल्या १२ वर्षातला सर्वाधिक दर आहे.

**<><><><><>**

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या विश्वस्त मंडळाने २०२४-२५ साठी कर्मचाऱ्यांच्या ईपीएफ ठेवींवर सव्वा ८ टक्क्यांचा व्याजदर कायम ठेवण्याची शिफारस केली आहे. ही शिफारस केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठवली जाईल. मंजुरीनंतरच व्याजाची रक्कम ईपीएफओ खात्यात जमा केली जाईल.

**<><><><><>**

दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाचं सरकार असताना कोविड काळात आरोग्यासाठी असलेला निधी पूर्ण खर्च झाला नाही, अनेक प्रकल्प प्रलंबित राहिले, दिल्लीतल्या रुग्णालयात औषधं आणि मनुष्यबळाची कमतरता होती, असं निरीक्षण कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आज दिल्ली विधानसभेत हा अहवाल मांडला. केंद्र सरकारनं कोविड काळात दिलेल्या ७८८ कोटी रुपयांपैकी सरकारनं केवळ ५४३ कोटी रुपये वापरले, असं यात म्हटलंय.

**<><><><><>**

देशात उपलब्ध असलेल्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचा वापर करुन संरक्षण क्षेत्रासाठी उपयुक्त तंत्रज्ञानाची निर्मिती करण्याचं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी युवकांना केलं आहे. देशाचं रक्षण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी सरकार कटीबद्ध असल्याचं ते म्हणाले. हैदराबादमध्ये विज्ञान वैभव २०२५ या परिषदेचं उद्घाटन केल्यावर ते बोलत होते.

**<><><><><>**

गेल्या २ वर्षांत देशभरात कोळशाची वाहतूक दुप्पट झाल्याचं सरकारनं म्हटलं आहे. रेल्वे-सागरी-रेल्वे मार्गानं कोळशाची वाहतूक २०२२ मध्ये २ कोटी ८० लाख मेट्रिक टन इतकी होती. ती २०२४ मध्ये ५ कोटी ४० लाख मेट्रिक टन इतकी झाली असल्याचं कोळसा मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

सातत्यानं सुरू असलेल्या घसरणीमुळे देशातले शेअर बाजार ९ महिन्यातल्या नीचांकी पातळीवर पोहोचले आहेत. आज मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४१४ अंकांची घसरण नोंदवत ७३ हजार १९८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ४२० अंकांनी घसरुन २२ हजार १२५ अंकांवर स्थिरावला.  गेल्या वर्षी जून महिन्यात शेअर बाजार या पातळीवर होते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरच्या ऐतिहासिक उच्चांकी पातळीच्या तुलनेत बाजार १५ टक्क्यांनी घसरले आहेत.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज लाहोरमध्ये सुरु असलेल्या सामन्यात अफगाणिस्ताननं ऑस्ट्रेलियापुढं विजयासाठी २७४ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून २७३ धावा केल्या. सादीकुल्लाह अटलनं ८५, अजमतुल्ला उमरझईनं ६७ धावा केल्या, ऑस्ट्रेलियातर्फे बेन ड्वारशुइसनं ३, तर स्पेन्सर जॉन्सन आणि ॲडम झांपा यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली. मात्र, तेराव्या षटकात त्यांच्या १ बाद १०९ धावा झाल्या असताना पावसाचा व्यत्यय आल्यानं खेळ थांबवावा लागला.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवसअखेर केरळचा पहिला डाव ३४२ धावांवर संपला. त्यामुळे विदर्भाला पहिल्या डावात ३७ धावांची आघाडी मिळाली.

केरळचा आदित्य सरवटे आज ७९ धावांवर बाद झाला. त्यानंतर कर्णधार सचिन बेबीनं डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याचं शतक थोडक्यात हुकलं. तो ९८ धावांवर बाद झाला. इतर फलंदाज दीर्घ खेळी करु शकले नाहीत. विदर्भातर्फे दर्शन नळकांडे, हर्ष दुबे आणि पार्थ रेखाडे यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले.

**<><><><>**

महिलांच्या प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत, आज बंगळुरु इथं मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅप्टिल्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅप्टिल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ९ षटकात २ बाद ४९ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या मेटा या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्सॲप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या ५०० सेवा सामान्य नागरिकांना व्हॉट्सॲपवर मिळणार आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मुंबई टेक वीक २०२५ या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते 'गव्हर्निंग द फ्युचर - एआय अँड पब्लिक पॉलिसी' या विषयावर बोलत होते.

केंद्र सरकारनं नवीन फौजदारी दंड संहिता लागू केली आहे. शक्ती कायद्यातल्या अनेक तरतुदी त्यात समाविष्ट आहेत. त्यामुळं शक्ती कायद्याचं स्वरुप बदलून नवीन कायदा आणावा लागणार असल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट - देवेंद्र फडनवीस (३६ सेकंद)**

**<><><><><>**

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नी समन्वयक मंत्री म्हणून राज्य सरकारनं चंद्रकांत पाटील आणि शंभुराज देसाई यांची नियुक्ती केली आहे. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणी प्रकरणी वकीलांशी समन्वय साधण, सीमा भागातल्या मराठी भाषिकांचे प्रश्न सोडवण, याकरता ही नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

पुण्यातल्या स्वारगेट बस स्थानक महिला अत्याचार प्रकरणी आरोपी दत्तात्रय गाडे याला न्यायालयानं १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मध्यरात्री त्याला शिरूर तालुक्यातल्या गुनाट गावातून अटक केली होती. हे प्रकरण द्रुतगती न्यायालयात चालवलं जाईल, अशी माहिती पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

**//<><><><><>//**